# दिवाळी

जोशूची दिवाळी
मोठी मजेत गेली
दिवाळीला पाव्हणे मंडळी
बरीच होती आली.

कधी नवत लवकर उठणे
अभ्यंगस्नान, लावून उटणे
मग फराळाचे खाणे
दुपारी डाराडूर झोपणे.

मुंबईच्या मामांनी
फटाके होते आणले
ठो! ठो! वाजवून
मजा करू म्हणाले!

जोशूच्या शाळेत
सर्वांनी शपथ घेतली होती
प्रदूषणमुक्त दिवाळी
साजरी करायची होती.

जोशूने तर
भाषणच ठोकले पाहुण्यांपुढे
मामांसाठी फटाका
एकही वाजला नाही
जोशूच्या घराभोवती!

जोशूला सारे काही
खूप काही कळत होते!
हेच त्याला कळत नव्हते
इतरांना का कळत नव्हते?